Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- VI JUNE 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# उस्मानाबाद जिल्हयातील बाल भिक्षेकरी : एक सामाजिक समस्या व उपाय

डॉ. कैलास सर्जेराव मोटे
स. प्राध्यापक
एसएसजेपी एम.एम. कॉलेज, आळणी उस्मानाबाद

१.प्रास्ताविक :

भारत देशाची लोक संख्या ही जगातील सर्वाधिक दोन नंबरची लोक संख्या आहे. या लोकसंख्येत तरूणांचे प्रमाण अधिक आहे. भारतातील लहान मुलांची संख्या जगातील लहान मुलांच्या संख्येच्या १९ ते २० टक्के एकटया भारत देशात आहे. एवढेच नव्हे तर भारत देशाला तरूणांचा देश म्हणून ओळखले जाते. विशाल लोकसमुदाय असलेल्या देशामध्ये ज्या प्रमाणात सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक व आरोग्य विषय विकास होणे अपेक्षित होते त्या प्रमाणात झालेला नाही. आजही भारत देशाला विकसंशील देश म्हणूनच ओळखले जाते. रोजगार, बेकारी, कुपोषण, बालमृत्यू, जातीयता, अंधश्रध्दा, आरोग्य इत्यादीचे प्रश्न मोठया प्रमाणावर भेडसावत आहेत. केंद्र सरकार मुलांचे आरोग्य, शिक्षण, संरक्षण, संगोपन या बाबतीत मोठया प्रमाणावर काम करत आहे. परंतू देशातील सर्वच राज्यांची परिस्थिती सारखी नाही. आदीवाशी व आर्थिक तसेच सामाजिक बाबतीत मागासलेल्या राज्यामध्ये सर्वच प्रश्न गंभीर आहेत. आजही भारतामध्ये आदिवाशी, ग्रामिण व शहरातील झोपडपट्टी भागामध्ये कुपोषणाचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. शासनाच्या विविध योजना आहेत परंतू या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होतांना दिसत नाही. याला जेवढी शासकिय यंत्रणा जबाबदार आहे तेवढयाच प्रमाणात पालक वर्गही जबाबदार आहे. याचे कारण असे की, मुलांच्या प्रश्नाकडे होणारे दुर्लक्ष, शिक्षणाचा अभाव व कमी वयात मुला मुलींचे होणारे बाल विवाह, आजही भारतात बाल विवाह मोठया प्रमाणावर होत आहेत. शासन बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी महिला व बाल विकास विभाच्यावतीने विविध उपक्रम राबवत आहे. यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ तयार करण्यात आलेला आहे. परंतू शासनाच्या नियमांकडे तसेच कायदयाकडे डोळे झाक करून विवाह होत आहेत. मुलांपेक्षा मुलींच्या बाल विवाहाचे प्रमाण हे मोठया प्रमाणावर आहे. बाल विवाह झाल्यामुळे बाल मातांचा प्रश्न निर्माण होऊ लागल आहे. यामुळे बाल मातांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. तसेच बाल मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे. जागतीक अहवाला नुसार सर्वाधिक बाल मृत्यूचे प्रमाण भारतात आहे. याची विविध करणे आहेत. भारतात आदिवाशी बहूल भागात बालविवाहाचे प्रमाण आधिक आहे. यामुळे मुडदूस, कुपोषण, बाल मृत्यूचे प्रमाण आधिक असल्याचे पाहावयाला मिळते. लहान मुलांच्या पालण पोषणांची जबाबदारी पालकांची आहे. वयाच्या १८ वर्षा पर्यंत मुलांच्या संगोपणाची सर्वस्वी जाबाबदारी आई— वडिलांची आहे. परंतू आई वडील अंधश्रध्दा, गरीबीचा आधार घेऊन बहुतेक पालक मुलांचा वापर विविध कामासाठी करत आहेत, तसेच भीक मागण्यासाठीही काही गरीब कुटुंबातील पालक करतात. यामुळे बाल मजूर, बाल भिक्षेकरी, बाल गुन्हेगार व दहशतवादासारखे प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे मुले त्यांच्या हक्क व कर्तव्यापासून दूर जातांना दिसत आहेत.

२. संयुक्त राष्ट्रसंघाने लहान मुलांसंदर्भात केलेल्या तरतूदी :

संयुक्त राष्ट्र संघाने १९४८ मध्ये ५८ देशाने एकत्र येऊन मानव अधिकराच्या प्रस्तावाला मान्यता दिली आणि १० डिसेंबर हा दिवस मानवाधिकार दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी व्यक्तिमत्वाची जन्मजात प्रतिष्ठा योग्यता आणि स्त्री पुरूषांचे समान हक्क तसेच मानवास भाषण स्वात्रंत्र्य, भया पासून मुक्ती अशी सर्वसाधारण लोकांची सर्वोच्च आकांक्षा शाबूत राहण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या परिषदेमध्ये मानव अधिकाराची सार्वभौम घोषणा करण्यात आली. यालाच आपण युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ हयुमन राईट्स असे म्हणतो. या जाहिरनाम्यात एकूण ३० कलमे आहेत. या आयोगाने १९७८ मध्ये यूएन जनरल असेंब्लीमध्ये

मानवाधिकाराचे सार्वभौम घोषणापत्र मंजूर करण्यात आले होते. ज्यात कलम २५ मध्ये बालपण विशेष काळजी आणि मदतीचा हक्क असा उल्लेख केला आहे. १९५९ मध्ये यूएन जनरल असेंब्लीने मुलांच्या हक्कांच्या घोषणांचा अवलंब केला. ज्याने भेदभावापासून मुलांचे स्वातंत्र्य आणि नावाचा अधिकार व राष्ट्रीयत्व यासारखे अधिकार याचा समावेश करण्यात आलेला होता. हे विशेषत: मुलांचे शिक्षण, आरोग्य, काळजी आणि विशेष संरक्षणावरील अधिकार यांचा समावेश विशेषत्वाने करण्यात आलेला होता.

१९७९ ला आंतरराष्ट्रीय बाल वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते. तसेच १९८९ मध्येही आंतरराष्ट्रीय बाल वर्ष म्हणून घोषित करण्यात आले. १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या जनरल असेंब्लीने बाल हक्कांच्या अधिवेशनास एकमताने मंजूरी दिली. १९९० मध्ये न्यूयॉर्कमध्ये मुलांसाठी जागतिक समिट आयोजित करण्यात आले होते. यामध्ये नेत्यांनी जागतिल संरक्षण आणि मुलांच्या विकासाच्या घोषणेवर तसेच २००० सालापर्यंत ठरवलेली उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी कृती आराखडायवर स्वाक्षरी करण्यात आली. जगातील बाल कामगारांच्या प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. २००० मध्ये यूएन मिलेनियम डेव्हलपमेंट गोलमध्ये मुलांशी संबंधित विशिष्ट उद्दिष्टे समाविष्ट आहेत. ज्यात मुलांची विक्री कमी करणे, बाल वेश्याव्यवसाय आणि बाल अश्लिलता यांचा समावेश आहे. २००२ मध्ये यूएन जनरल असेंब्लने मुलांविषयी विशेष अधिवेशन आयोजित केले आणि यामध्ये पहिल्यांदा मुलांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे बाल हक्कांची परिभाषा मानवी हक्क म्हणून केली गेली आणि तरूणांना देण्यात येणाऱ्या विशेष संरक्षण आणि काळजीच्या अधिकारावर विशेष लक्ष दिले गेले. प्रत्येक मुलास जगण्याचा हक्क मिळवून देणे हा उद्देश होता. जागतिक मानवी हक्क आयोगाच्या कलम २५ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, प्रत्येकास स्वत:चे व आपल्या कुटुंबीयांचे आरोग्य व स्वास्थ्य यांच्या दृष्टीने समुचीत रहानिमान राखण्याचा अधिकार आहे. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, वैद्यव्य किंवा वार्धक्य यामुळे किंवा त्याच्या आवाक्या बाहेरील परिस्थितीमुळे उदर निर्वाहाचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यास सुरक्षितता मिळण्याचा अधिकार आहे. तसेच माता व मुले यांना विशेष देखरेख व मदत मिळण्याचा हक्क आहे, सर्व मुलांना मग ती औरस असोत किंवा अनौरस त्यांना सारखेच सामाजिक संरक्षण मिळाले पाहिजे असे प्रस्तुत कलमामध्ये स्पष्ट केले आहे.

यूएनआरसी अधिवेशनाची चार मुख्य तत्त्वे अशी होते की, मुलांच्या चांगल्या हितासाठी भक्ती, जीवन जगण्याचा व विकासाचा हक्क, मुलांच्या दृष्टीकोनाचा किंवा मतांचा आदर करणे. प्रत्येक देशाच्या शासनाने मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि ते सुनिश्चित करण्यासाठी स्वत:स वचनबध्द असल्याचे यूएनमध्ये स्पष्ट केले होते.

३. भारतात मुलांसाठी करण्यात आलेल्या तरतूदी :

प्राथमिक शिक्षणाचा अधिकार याचा समावेश करण्यात आलेला आहे, कलम २४ बालकामगार आणि मुलांच्या घातक रोजगारास स्पष्टपणे प्रतिबंधित करते. अनुच्छेद ३९(एफ) मुलांच्या कल्याणासाठी धोरण आपल्या राज्यामध्ये पुढे निर्देशित करते. कलम ३९(सी) मध्ये अशी तरतूद केली आहे की, मुलांवर अत्याचार होऊ नयेत आणि त्यांना निरोगी पध्दतीने विकसित होण्याची संधी दिली पाहिजे, कलम ४५ मध्ये मुलांसाठी विनामूल्य आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अनुच्छेद ४७ मध्ये असे म्हटले आहे की, पोषण आणि जीवनमान स्तर वाढविणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्यांचे कर्तव्य आहे. तर राज्य घटनेच्या ८६ व्या घटना दूरूस्तीनूसार मूलभूत कर्तव्यामध्ये वाढ करण्यात आली व असे नमुद केले की, पालकाने मुलांना वयाच्या सहाव्या वर्षा पासून ते १४ वर्षा पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दयावी अशी तरतूद राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली आहे.

भारतातील कोर्टाने असे नमूद केले आहे की, मुलांना एखाद्या निर्जीव वस्तूसारखे किंवा आई–वडीलांच्या मालमत्तेसारखे वागवता येणार नाही. शिवाय मुलांचे कल्याण तसेच गुन्हेगारी आणि अत्याचार रोखण्यासाठी बरेच कायदे बनविण्यात आले आहेत. भ्रूणहत्या हा आयपीसीच्या कलम ३१६ अंर्तगत गुन्हा आहे आणि बाल मृत्यू हे आयपीसी च्या कलम ३१५ आणि ३१६ अंतर्गत गुन्हा आहे. आयपीसी च्या कलम ३०५ अन्वये आत्महत्या करणे हा गुन्हा आहे आणि आई वडीलांने मुलांचा त्याग करणे हाही गुन्हा आहे. भीक मागण्यासाठी मुलांचे अपहरण करणे यासाठी आयपीसी कलम ३६६, ३६७, ३६९ नुसार गुन्हा

नोंदवला जावू शकतो. आयपीसी कलम ३६६ 'अ' नुसार अल्पवयीन मुलींची खरेदी व विक्री करणे हा गुन्हा आहे.

मुलांच्या हक्क व कर्तव्यासंदर्भात भारतीय राज्यघनेमध्ये तसेच राष्ट्रीय मानवी हक्क आयोगामध्येही तरतूद करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर मुलांसाठी स्वतंत्र कायदेही तयार करण्यात आले. ज्यामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६, हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१, बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम २००६, लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम २०१२, मुंबई भिक्षा प्रतिबंधक अधिनियम १९६०, बाल कामगार अधिनियम १९८६, २०१६, २०१८ असे विविध कायदे करण्यात आले आहेत. तरी ही बाल कामगार व बाल भिक्षेकरी याचे प्रश्न भारतात व महाराष्ट्र राज्यात निर्माण होतांना दिसत आहेत.

२०१६ मध्ये लोकसभेमध्ये बाल कामगारासंदर्भाचे विधेयक मांडून ठराव पास केला की, चौदा वर्षाखालील मुलांना कामावर जुंपणे हा दखलपात्र गुन्हा ठरवणारे बालकामगार प्रतिबंध व नियंत्रण दुरूस्ती विधेयक लोकसभेने मंजूर केल्याने बाल मजूरीत दरवर्षी ढकलल्या जाणाऱ्या लाखो बालकांचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासंदर्भात तरतूद केली आहे. बाल मजूरी संदर्भात जो कायदा अस्तित्वात होता तो कायदा अधिक मजबूत करण्यासाठी शासनाने हया कायदयात दूरूस्ती करून बाल मजूरी कमी करण्यासाठी हा कायदा अधिक कठोर केला आहे. या दुरूस्ती विधेयका नुसार बालमजूरी हा दखलपात्र गुन्हा मानला जाईल अशी तरतूद कायदयात केली आहे. यासाठी २० ते २५ हजार रूपये दंड आणि सहा महिने ते दोन वर्षापर्यंत तुरूंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

भारतामध्ये बाल कामगार व बाल भिक्षेकरी यांचे प्रश्न आजही सूटलेले नाहीत याची विविध कारणे आहेत. बाल कामगार व बाल भिक्षेकरी यांना मिळणारा पैसा कमी वयात मुलांच्या हातात पडू लागल्यामुळे मुले वाम मार्गाला जाऊ लागले आहेत. तसेच ते शिक्षण व्यवस्थे पासून ही दूर जातांना दिसत आहेत. शिक्षण हे मानवी सामाजिक विकासाचे महत्वाचे साधन आहे. ''शिक्षण हे वाघिनीचे दूध आहे, जो पिणार तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही.'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. यासाठी शिक्षण सर्वापर्यत पोहचणे आवश्यक आहे. उस्मानाबाद जिल्हयातील बाल कामगारांचे प्रमाण कमी असले तरी बाल भिक्षेकरी यांचा प्रश्न मोठा गंभीर आहे. यामुळे मुले शिक्षण व्यवस्थेपासून दूर जातांना दिसत आहेत. जिल्हयातील शैक्षणिक परिस्थिती बरोबरच भौगोलिक परिस्थिती ही तेथील अर्थकारणाचे व लोकांच्या सद्याच्या दैनंदिन जीवनासाठी कारणीभूत आहेत. उस्मानाबद जिल्हा हा अवर्षणग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाला भौगोलिक, धार्मिक, राजकिय, समाजिक, औद्योगिक या पैकी कोणतीच अशी प्रभावी पार्श्वभूमी लाभली नाही.

भारतातील मागास भागातील जिल्हयांचा विकास व्हावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या नीती आयोगाने देशातील १०१ मागास जिल्हयांची यादी तयार केली असून त्यात महाराष्ट्रातील चार जिल्हयांचा समावेश आहे. सुधारणा होत असलेल्या पण मागास अशा राज्यातील पहिल्या चार जिल्हयांच्या यादीत उस्मानाबाद जिल्हयाचा समावेश आहे. उस्मानाबाद जिल्हा राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचा मागास जिल्हा म्हणून राज्याच्या व देशाच्या यादीत आहे. नीती आयोगाने मागासलेपणाचे निकष लावतांना पाच विभागाचा अभ्यास केला होता ज्यामध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, आहार, आर्थिक स्वायत्तता आणि कौशल्य विकास तसेच पायाभूत सुविधा या निकषांचा विचार करण्यात आला होता. एवढेच नव्हे तर पुढे जाऊन आपणास असे ही म्हणता येईल की, या जिल्हयात औद्योगिक विकासाचा ही अभाव जाणवतो. यामुळे रोजगाराच्या संधी कमी असल्याने बेकारीचा प्रश्न उदभवतो. त्याच बरोबर कौशल्याधारीत व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उणिव असल्याचे ही लक्षात येते. उस्मानाबाद जिल्हयातील शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, शाळा वाडी–वस्तीमध्ये निर्माण केल्या पण त्याचा प्रसार प्रचार करण्यात शिक्षण व्यवस्था कमी पडत आहे असे म्हणावे लागते. शिक्षणाचे महत्त्व व त्याची आवड पालकामध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. जो पर्यंत पालकामध्ये शिक्षणाची आवड निर्माण होणार नाही व त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटत नाही तो पर्यंत मुले शिक्षण प्रवाहा पासून दूरच राहतील.

जिल्हयातील आदिवाशी, भटक्या व आर्थीक दृष्टया मागास समाजातील पालकांना शिक्षणाचे महत्त्व आणखी पटलेले नाही एवढेच नाहीत तर जिल्हयातील

मुस्लीम समाजातील पालकांमध्ये ही शिक्षणाविषयी उदाशिनता दिसते आज या समाजातील बहुतांश मुले ही नावाला प्राथमिक शाळेमध्ये प्रवेशित आहेत, त्यांचे शाळेतील प्रत्येक्ष उपस्थितीचे प्रमाण हे अत्याल्प आहे. एवढेच नव्हे तर लेखन, वाचन व गणिती क्रिया ही कौशल्य प्राथमिक स्तरावरील शेवटच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलास पुरेशे अवगतही नाही. या समाजातील मुले ही छोटया मोठया व्यावसायाकडे आकर्षित झालेले आहेत. नव्हे त्यांना त्यांचे पालक लहान वयातच व्यवसाय करण्यास प्रेरीत करतात. कमी वयात पैसा हातात पडू लागल्याने त्यांना शाळा नकोशी झाली आहे.

उस्मानाबाद जिल्हयात अनेक मंदिर, मज्जित आहेत. या जिल्हयात राज्यातून व राज्या बाहेरून अनेक भाविक भक्त येतात. मंदिर परिसरात लहान मोठा व्यवसाय करणारांची संख्या अधिक आहे. धार्मिक ठिकाणी आर्थिक दृष्टया मागासलेल्या समाजातील लहान मुले ही शाळेत जात नाहीत. शाळेत फक्त नाव नोंदवलेले असते प्रत्यक्षात ती या धार्मिक ठिकाणी शाळा सोडून भीक मागतांना दिसतात. पालकच या मुलांना भिक मागण्यासाठी प्रवृत्त करतात असे मुलांशी केलेल्या संवादावरून लक्षात येते. मुलं पालकांना चार पैसे आणून देतात त्यामुळे पालक समाधानी असतात सहानभूती, अंधश्रध्देच्या पोटी येथील लोक बालकाना भीक देतात. यामुळे भिक्षेकरी समाजाचे प्रमाण या जिल्हयात वाढतांना दिसत आहे.

४. बाल भिक्षेकरी कोणास म्हणावे :

मुंबई भिक्षेकारी प्रतिबंधक अधिनियम १९५९ व महाराष्ट्र बाल भिक्षेकरी अधिनियम १९६० नुसार जी मुले वय वर्षे १८ च्या आतिल आहेत अशी मुले अनोळखी व्यक्तीची इच्छा नसतांना त्या व्यक्तीकडे वस्तू वा पैशाची मागणी जबरीने, हातपाय जोडून व भावनिकतेची साद घालून तसेच एखादी वस्तू विकत घेण्यास लोकांकडे आग्रह धरतात याला बाल भिक्षेकरी असे म्हणतात.

सार्वजनिक ठिकाणी आपल्या व्याधींचे, जखंमाचे, अपंगत्वाचे किंवा असहाय्यतेचे प्रदर्शन करून पैसे किंवा अन्नवस्त्रादी अन्य वस्तूंची याचना करणे म्हणजे भीक मागणे आणि या मार्गाने उपजीविका करणारा तो भिकारी आणि ज्याचे वय १८ वर्षाच्या आतील आहे असा भीक मागणारा तो बाल भिक्षेकरी होय.

५. भिक्षेकऱ्यां विषयीचे कायदे :

भारतात १८७४ मध्ये ब्रिटिश शासनाने यूरोपियन व्हेग्रन्सी ॲक्ट करून यूरोपियन व्यक्तीला भीक मागण्यास बंदी केलेली आढळे. १९२६ मध्ये मुंबईतील भिऱ्यांच्या अभ्यासासाठी शासनाने प्रथमच एक सनदी अधिकारी नेमला होता. त्याच बरोबर फौजदारी व्यवहार संहिता कलम १०९ मध्ये ज्याला उदरनिर्वाचे प्रकट साधन नसेल किंवा जो आपणा विषयी व्यवस्थित माहिती देऊ शकत नाही तो भिकारी असे म्हटलेले आहे ५५ व्या कलमात उनाड लोकांचीही अशीच व्याख्या करून १३३ व्या कलमात सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करण्यास त्यांना बंदी घातली आहे. भारतीय रेल्वेने कायदा १९४१ नुसार रेल्वेगाडयांमधून भीक मागण्यास प्रतिबंध केलेला आहे.

मुंबई भिक्षेकारी प्रतिबंधक अधिनियम १९५९ व महाराष्ट्र बाल भिक्षेकरी अधिनियम १९६० हे कायदे लहान मुलांच्या भीक माण्यासंदर्भात तयार करण्यात आले आहेत.

६.जिल्हयात बाल भिक्षेकरी निर्माण होण्याची कारणे : —

१.पालकांची आर्थिक परिस्थिती.
२.पालकांचे अज्ञान, गरिबी व शिक्षणाचा अभाव.
३.रोजगाराच्या संधीचा अभाव.
४.बाल विवाह.
५.दूर्लक्षीत बालके.
६.अंधश्रध्दा.
७.मानवी वाहतूक.
८.भीक मागणे एक व्यवसाय.
९.पालकांची कष्ट करण्याची उदाशिनता.
१०.कुटुंबातील कमावणारांची संख्या कमी व बसून खानारांची संख्या जास्त
११.दुष्काळ — ओला व कोरडा
१२.व्यसनाधिन पालक
१३.वेश्याव्यावसाय करणारे पालक

७.बाल भिक्षेकारी यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या :

आज जिल्हयातील बाल भिक्षेकऱ्यांमुळे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या समस्यांचे स्वरूप सामाजिक समस्या म्हणून तयार झाले आहे. बाल भिक्षेकऱ्यामुळे भाविकांना व स्थानिक नागरिकांना जो

त्रास सहन करावा लागत आहे, त्या त्रासाचे स्वरूप आजच्या पेक्षा उदया मोठे होणार आहे. बाल भिक्षेकरी एखादया भाविकभक्ताने जर भीक दिली नाही तर हे बाल भिक्षेकरी त्या भाविकभक्तांना अपशब्ध बोलण्यास कमी करत नाहीत. एवढेच नव्हे तर भाविकांच्या मुलांना मारहान पण करतांना दिसत आहेत. त्याच बरोबर ही मुले चोरी, मारामारी या प्रवृत्तीकडे वळू लागल्याणे समाजामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक छोटे – मोठे व्यावसायिक, शासकीय कर्मचारी यांना ही या बाल भिक्षेकरी यांच्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे.

आज जी मुले भीक मागत आहेत ते उदयाच्या नागरिकरणासाठी धोकादायक आहेत. ही मुले मोठी झाल्यावर चोरी मारामारी, खूण, अश्लिल चाळे, व्यसनाधिनता या प्रवृत्तीकडे आकर्षीत झाल्याशिवाय राहणार नाहीत. याला वेळीच आवर घातला नाही तर बाल भिक्षेकरी यांचे प्रमाण वाढल्याशिवाय राहणार नाही असे एक ना अनेक समाजाला विघातक अशा समस्या व प्रश्न बाल भिक्षेकरी मुलांमुळे निर्माण होत आहेत.

८.बाल भिक्षेकरी रोखण्यासाठी शासकिय यंत्रणेमार्फत राबविण्यात आलेले उपक्रम :

जिल्हयातील बाल भिक्षेकरीसंदर्भाचा प्रश्न राज्य बाल हक्क आयोग व राष्ट्रीय बाल हक्क आयोग यांच्या पर्यत पोहचला होता. यांच्या बैठकीत बाल भिक्षेकरी थांबवण्यासाठी विविध उपक्रम आखले व त्याप्रमाणे कार्य ही चालू केले. टास्क फोर्स (कार्यदल) ची स्थापना करण्यात आली. यामध्ये चाईल्ड लाईन, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्थानिक पोलिस, तहसिलदार, मंदिर प्रशासन, बाल कल्याण समिती, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, नगरपालिका अधिकारी इत्यादी शासकिय पदाधिकाऱ्यांचा समावेश असलेले एक टास्क फोर्स स्थापन करण्यात आले होते. याचा मुख्य उद्देश होता तो म्हणजे बाल भिक्षेकऱ्यांना भीक किंवा भिक्षा मागण्यापासून परावृत्त करणे व मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हा प्रमुख उद्देश होतात. त्यानुसार विविध समित्या तयार करून आयोगाच्या मार्गदर्शक सुचने नुसार दिनांक १९/०२/२०१९, १९/०३/२०१९ त्यानंतर ३१/०५/२०१९ व ३१/०८/२०१९ त्यानंतर २०/०९/२०१९ मध्ये टास्क फोर्स च्या पदाधिकाऱ्यानी धाडसत्र राबवले. यात बरेच बाल भिक्षेकरी सापडले त्या बाल भिक्षेकऱ्यांना बाल कल्याण समिती समोर हजर करण्यात आले होते बाल कल्याण समितीने या मुलांची बालगृहात सोय करून त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण याची सोय केली. परंतू पालकांने मुलांना ताब्यात घेण्यासंदर्भात वकिला मार्फत लेखी हमीपत्र देऊन मुलांना ताब्यात घेतले. 'मुले पुन्हा भीक मागणार नाहीत, मागितली तर आम्हाला शिक्षा करा' अशा आशयाचे हमीपत्र पालकांनी समितीला लिहून दिले होते. मुलांची सर्व बाबतीत सोय करूनही पालक मुलांना शासनाच्या बालगृहात ठेऊ शकले नाहीत. एवढे करूनही बाल भिक्षेकऱ्याचे उच्चाटन करण्यात कोणालाच यश आले आहे असे म्हणता येणार नाही. जे अभियान राबवले याचा परिणाम सकारात्मक ही झाला. परंतू पुन्हा बाल भिक्षेकरी यांनी भीक मागण्यास सुरूवात केली. याला पोलिस यंत्रणेकडून होणारे दूर्लक्ष व मिळणारे असहकार्य, समाज व्यवस्थेचे होणारे दूर्लक्ष, स्थानिक यंत्रणा आणि मंदिर प्रशासन हे कारणीभूत आहेत असे एकंदर परिस्थितीवरून स्पष्ट होते. यामुळे बाल भिक्षेकरी यांचे उच्चाटन होऊ शकले नाही. स्टास्क फोर्सने जे अभियान दहा दिवसाला किंवा पंधरा दिवसाला रावणे आवश्यक होते ते राबवले नाही. जबाबदारी कोणाची या वादात बाल भिक्षेकरी यांचा प्रश्न अनुत्तरीत राहिला. बाल भिक्षेकरी यांना रोखतांना जी भूमीका मंदिर संस्थान व पोलिसांची असणे आवश्यक आहे ती भूमीका याच्याकडून प्रभावी पार पाडली जात नाही. यामुळे आज बाल भिक्षेकरी यांचा प्रश्न संपवणे आवघड झाले आहे. याचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी सर्वच यंत्रणांनी प्रभावी कार्य करणे आवश्यक आहे. शासनामार्फत बाल भिक्षेकरी याच्यासाठी बऱ्याच सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत जसे की,

- निवारा किंवा वस्तीगृहाची सोय उपलब्ध करून दिली जाते.
- सामाजिक जनजागृती करणे – जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाईन, समाजसेवक, समाजिक संस्था, पत्रकार यांच्या मार्फत जनजागृती केली जात आहे.
- शैक्षणिक साहित्याची मदत केली जाते.

बाल भिक्षेकरी यांचे उच्चाटन करण्यासाठी वरील उपाय योजना करण्यात आल्या. परंतू याची काटेकोर अंमलबजावणी होतांना दिसत नाही. या प्रश्नांकडे ज्या प्रमाणे बाल विकास विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे तेवढे लक्ष दिले जात नाही. नव्हे या विषयाकडे

गांभिर्याने पाहिले जात नाही. यामुळे हा प्रश्न गंभीर स्वरूपाचा होत जातांना दिसत आहे.

९. जिल्हयातील बाल भिक्षेकरी थांबवण्यासाठी उपाय :

१.बाल कल्याणासाठी काम करणाऱ्या शासकीय यंत्रणांनी दूर्लक्षीत, पिडीत, शोषित, भिक्षेकरी, बाल कामगार, मानवी वाहतूक यामध्ये आढळलेल्या व माहिती मिळाल्या नंतर धाडसत्र राबवून अशा मुलांना ताब्यात घेवून बाल कल्याण समिती समोर हजर करणे आवश्यक आहे.

२.चाईल्ड लाईन व बाल संरक्षण कक्ष यांचे मार्फत सामाजिक जणजागृती करणे गरजेचे आहे.

३.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदस्य सचिव या नात्याने संबंधित यंत्रणेवर लक्ष ठेवून प्रभावी कामकाजाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे त्या संदर्भात संबंधित यंत्रणेला प्रोत्साहण देणे गरजेचे आहे. तसेच आधिकाराची निश्चिती करावी.

४.काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती तळागाळातील बालक व पालका पर्यत पोहचवणे आवश्यक आहे.

५.भिक्षा मागणाऱ्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी नवनविन उपक्रमांची आखणी करावी लागणार आहे ही मुले गरिब कुटुंबातील असल्याने त्यांच्यासाठी अन्न, वस्त्र, शैक्षणिक साहित्य व वस्तीगृह याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

६.दारिद्रय निर्मुलनासाठी प्रयत्न करणे.

७.पालकांचे उद्‌बोधन करून परिणामाची माहिती देणे.

८.शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे तसेच आनंददायी शिक्षणाची व्यवस्था करणे.

९.सर्व मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे.–पाठयपुस्तके, गणवेश देणे.

१०. कुटुंबाचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे.

११. रोजगार निर्मिती करणे.

१२. लोकसख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे. / कुटुंब नियोजनास प्राधान्य देणे.

१३. मंदिर प्रशासन व शासकीय यंत्रणा यांनी कठोर पावले उचलणे.

१४.बालकाने भीक मागितल्यास पालकांना शिक्षा करणे.

१५.अनाथ, शोषित, पिडीत, भिक्षेकरी बाल मजूर मुलांना मुख्य प्रवाहात आणणे.

१६.सार्वजनिक ठिकाणी स्टास्क फोर्सची स्थापना करणे.

१७.भिक्षेकरी मुलांची व पालकाची निवासाची व्यवस्था करणे.

१८. शानाच्या योजनांची माहिती तळा गाळातील लोकांपर्यत पोहोचविणे.

१९.व्यवसायाभिमुख शिक्षणाची व्यवस्था करणे.

२०.पोलिसांनी गस्त व धाडसत्र आयोजिक करणे. यासाठी स्थानिक नागरिक व व्यावसायिकांची मदत घ्यावी.

२१.टास्क फोर्स मधिल सदस्यांनी आपआपसात समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

२२.समाज व्यवस्था व मंदिर प्रशासन यांनी राबवायचे उपक्रम :

सामाजिक संघटना स्वयंसेवी संस्था, समाज सेवक, शाळा, व्यावसायिक यांनी मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनास सहकार्य करणे अपेक्षीत आहे. जागरूक राहून शासकीय यंत्रणांना भीक मागणारी मुले दिसली तर त्यांना कल्पना देणे, भीक न देण्यासंदर्भात धार्मिक स्थळांवर जाणिव जागृती करणे. जाणिव जागृतीचे फलक लावणे किंवा त्या संदर्भात इतर व्यवस्था करणे. मंदिर प्रशासनाने धार्मिक स्थळासमोर कोणीही भीक मागणार नाही यासाठी मंदिर प्रशासनाच्या वतीने उपाय योजना करणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची :

1. आपटे विद्या, (२०१८), काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसोबत काम करणाऱ्या वाटेकऱ्यासाठी पथदर्शिका – आयजेएम व प्रेरणा संस्था.

2.वार्ताहार, (२० एप्रिल २०१८), महिला व संरक्षण विभागाच्यावतीने भिक्षेकरी मुलांचे पनर्वसन : दै. तरूण भारत, मुंबई.

3.वार्ताहार,(१८ फेब्रुवारी २०१९), पालकच मुलांना मागायला लावातहेत भीक,दै. पुढारी.

4-संपादक, (०५ एप्रिल २०२०), मानवाधिकार अबाधित राहण्यासाठी, दै. पुढारी.

5.संपादक,(२८ जुलै २०१६), काहिसा दिलासा पण .... दै.महाराष्ट्र टाइम्स.

6.Anupma Kaushik, Rights of Children: A case Study of Child Beggars at Public Places in india.

7- Wcd.nic.in/ckyd&vf/kf;e&1960] Ministry of women & child development.

8- www.bareactslive.com/MAH/MH- The Maharashtra prevention of Begging At. 1960.